श्री गुरुपौर्णिमा
२३ जुलै २०२१

॥श्री॥

## ॥जाग्रत जाग्रत॥

माता नास्ति पिता नास्ति नास्ति बन्धुः सहोदरः।
अर्थं नास्ति गृहं नास्ति तस्मात् जाग्रत जाग्रत॥

कुणी कुणाची नसते माता नसतो पिता कुणिही।
भाऊ सख्खा जुळा चुलत वा नसे कुणास कुणिही॥
द्रव्य नसे वा घरही कुणाचे ठसवा निजमानी नित्य
व्हा जागे व्हा जागे सावध जाणुनि अबाध्य सत्य॥१॥

जन्म दुःखं जरा दुःखं जाया दुःखं पुनःपुनः।
संसारसागरे दुःखं तस्मात् जाग्रत जाग्रत॥२॥
दुःख जन्मता जन्मे, जन्मे वार्धक्यामाधे दुःख।
पहिली दुसरी असो कोणती पत्नी देतसे दुःख।
अपार दुस्तर संसाराचा सागर भरला दुःखे।
म्हणून जागा सावध राही दूर सारण्या दुःखे॥२॥

कामः क्रोधश्च लोभश्च देहे तिष्ठन्ति तस्कराः।
ज्ञानरत्नापहाराय तस्मात् जाग्रत जाग्रत॥३॥
चोरायास्तव ज्ञानरूप हे तुज जवळी जे रत्न।
कामक्रोधलोभांच्या रूपे चोर करिती नित यत्न।
नरदेही ते तिघेही लपती शोधिती अचूक संधी।
जागा राही, टाक काढुनी, देऊ नको त्या अवधी॥३॥

आशया बध्यते जन्तुः कर्मणा बहुचिन्तया।
आयुः क्षीणं न जानाति तस्मात् जाग्रत जाग्रत॥४॥
आशांनी करकचून बांधी राही जीव तेथनी विषयांच्या॥
सकाम कर्मे विषयांचे तने चिंतांनी सुखदुःखांच्या।
नकळत जीवन सरते घटते क्षणाक्षणाने आयुष्य।
नकोस दवडू पळही, राही जागा, ठसवी निजलक्ष्य॥४॥

© www.madhaveeraghuveer.com

# जागते रहो।

~~सम्पद:~~ सम्पद: स्वप्नसंकाशा: यौवनं कुसुमोपमम्।
विद्युत् चंचलमायुष्यं तस्मात् जाग्रत जाग्रत ॥५॥

वैभव लक्ष्मी धनसंपत्ति स्वप्नासमचि ती मिथ्या।
कोमल पुष्पासम तारुण्यही राही क्षणात काया।
क्षणभंगुर आयुष्य विजेसम म्हणून सावध राही।
जागा होई सत्वर मनुजा झोप हितावह नाही ॥५॥

क्षणं वित्तं क्षणं चित्तं क्षणं जीवितमावयो:।
यमस्य करुणा नास्ति तस्मात् जाग्रत जाग्रत ॥६॥

क्षणजीवी धन, मनही चंचल, जीवन नव मम तेरे।
यावी करुणा दया न यम तो कठोर निश्चल बैसे।
कणक्षण व्यर्थ नये हा दवडू साधावे हित आपुले।
सावध होई जागा राही विषयांनी ना होई भले ॥६॥

यावत् कालं भवेत् कर्म तावत् तिष्ठन्ति जन्तव:।
तस्मिन् क्षीणे विनश्यन्ति तत्र का परिदेवना ॥७॥

जोवरि उरती कर्मभोग वा उरे जोवरी क्रियमाण।
तोवरि केवळ जीव राहतो धरतीवर धरुनी प्राण॥
क्षणात ज्याचे भोग संपती, कोणाचे ना पुढी उरती।
देह सोडुनी जीव जातसे क्षणीच त्या निज गृहाप्रती।
कशास्तव प्रलाप शोक करी त्यांच्या मागे।
व्यर्थ निरर्थक ठरेच सर्व ते कुणी कुणाचा नच लागे॥

— श्री. श्रीपाद केळकर
कल्याण

JUNE '14

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

© www.madhaveeraghuveer.com